<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १६७/१९८८ मधील निशाणी ४३३ खालील आदेश.</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. २ जाईबाई जंगम सोनावणे व प्रतिवादी क्र. १३ पद्मा मोहन कांबळे या मयत असल्यामुळे त्यांच्या नावाला कंस करण्यात यावा यासाठी दाखल केला आहे.

**प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–**

२. प्रतिवादी जाईबाई हिचे वारस पुर्वीच दाव्यात समाविष्ठ आहेत. तसेच पद्मा मोहन कांबळे यांना कोणीही वारस नाहीत. त्यामुळे त्यांच्या नावाला कंस होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाने वादी यांनी प्रतिवादी क्र. २ जाईबाई सोनावणे व प्रतिवादी क्र. १३ पद्मा कांबळे यांच्या नावाला कंस देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आक्षेप नोंदविला. प्रतिवादींच्या मते जाणुन बुजुन प्रकरण लांबविण्यासाठी वादी प्रयत्न करत आहे. विलंबाचे कोणतेही कारण अर्जामध्ये दिलेले नाही. वारसासंदर्भात शपथपत्र दिले नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली.

४. प्रस्तुत प्रकरणात मृत्यु उतारा निशाणी ४३६ वरुन जाईबाई सोनावणे या मयत झाल्याचे दिसुन येते. तसेच ग्रामपंचायत दाखल्यावरुन प्रतिवादी क्र. १३ पद्मा कांबळे याही मयत असल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र. २ जाईबाई हिचे वारस पुर्वीच रेकॉर्डवर आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. १३ यांना इतर वारस असल्याचे कथन केलेले नाही. त्यामुळे वादींनी मागणी केल्याप्रमाणे सदर अर्ज मंजुर करणे संयुक्तीक होईल.

त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींना प्रतिवादी क्र. २ व प्रतिवादी क्र. १३ यांच्या नावाला कंस करण्याची परवानगी देण्यात येते.

कोरेगाव. **(ए. बी. पाटील)**

दि. १२/१२/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.